प्रकरण दुसरे

# सत्यशोधक चळवळ - स्वरूप, व्याप्ती व तत्वज्ञान

प्रकरण दुसरे

# सत्यशोधक चळवळ - स्वरूप, व्याप्ती व तत्वज्ञान

महाराष्ट्रात १९ व्या शतकाच्या शेवटी व २० व्या शतकाच्या पूर्वार्धात अनेक सामाजिक व राजकीय चळवळी उदयास आल्या. त्यामध्ये म. फुले यांनी सुरू केलेली सत्यशोधक चळवळ अंत्यत प्रभावी होती. आधुनिक महाराष्ट्राच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनात महत्वाचे स्थान असलेली ही चळवळ मराठी प्रदेशात ग्रामीण व अज्ञानी जनतेपर्यंत पोहोचलेली पहिली चळवळ होय.

म. फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करण्यापूर्वी महाराष्ट्रात मानवधर्म सभा, प्रार्थना समाज, आर्य समाज इ. सामाजिक संस्था अस्तित्वात होत्या. परंतु त्यांची ठेवण व पध्दती मुख्यतः आध्यात्मिक व धार्मिक होती.[१] बहुजन समाज व गोरगरीब जनता अन्नास महाग झाली होती. परंतु वरील सामाजिक संस्था या दुबळ्या, निरक्षर सामान्य जनतेचे ऐहिक व सामाजिक प्रश्न सोडवू शकत नव्हत्या म्हणूनच अब्राह्मण समाजाच्या उध्दारासाठी सामाजिक विषमता नष्ट करावयाची असेल तर कनिष्ठ वर्गांना त्यांचे हक्क मिळाले पाहिजेत म्हणून २४ सप्टेंबर १८७३ रोजी पुणे येथे म. फुलेंनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. यावेळी महाराष्ट्रातील वेगवेगळ्या भागातून सुमारे ६० लोक जमले होते. फुल्यांनी सत्यशोधक समाजाच्या अनुयायासाठी 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ लिहिला. या समाजाचे सदस्यत्व सर्व जातीतील लोकांना खुले होते. सत्यशोधक समाजाचे पहिले अध्यक्ष व कोषाध्यक्ष म्हणून जोतीरावांची निवड झाली. नारायण गोविंदराव कडलक यांची कार्यवाह म्हणून निवड झाली.[२]

त्या काळात धर्माच्या नावाखाली समाजात अनेक चालीरीती, रूढीपरंपरा निर्माण झाल्या होत्या. अज्ञान, दारिद्रय, अंधश्रध्दा, जातीयता यांनी समाज पोखरला होता. समाजावर धर्माचे वर्चस्व होते. या सर्व गोष्टींचे निर्मुलन करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्रात ज्या अनेक समाज सुधारकांनी व सामाजिक संस्थांनी प्रयत्न केले. त्यापैकी सत्यशोधक चळवळ ही दीर्घकाळ चाललेली व समाज परिवर्तन प्रभावीपणे करणारी चळवळ ठरली.

हिंदु समाजातील धार्मिक गुलामगिरीने निर्माण केलेल्या व्यथा व वेदना कित्येक शतके ज्यांच्या वाट्याला आल्या त्या अब्राहमण, अस्पृश्य व स्त्री-शुद्र समाजाला ज्यांनी वाचा दिली व धाडशी वृत्तीने हे दुःख वेशीवर टांगले, त्या दुःखाचे मूळ ईश्वर निर्मित नसून ते समाजव्यवस्थेत आहे ते सत्य ज्यांनी सार्वजनिकरितीने समाजाच्या लक्षात आणून केले, त्या मूलगामी क्रांतीचे अग्रदूत म्हणून म. जोतिरावांचा उल्लेख करावा लागतो. धर्म, रूढी व परंपरेने लादलेली बौध्दीक गुलामगिरी, जन्मजात वर्चस्वातून निर्माण झालेली जातीव्यवस्था यांच्या समूळ उच्चाटनासाठी म. फुल्यांनी जनसामान्यांना संघटित केले.[३]

पुरोहितांनी स्त्री शुद्रांना ज्ञानापासून वंचित ठेवून व धर्मग्रंथावर स्वतःची मक्तेदारी निर्माण करून आपल्या वर्णवर्चस्वाला बळकटी आणली. त्यांची बुध्दी, शाब्दिक पांडीत्य, धर्मचिंतन व कर्मठपणा यातच खर्च होत होती. समाजाचा विकास व इतर प्रश्नांचा त्यांनी कधीच विचार केला नाही. ब्राह्मण सोडून सर्व जातींना त्यांनी शुद्र लेखले. हे वर्णवर्चस्व, जातीयता यांना पहिले आव्हान म. फुले यांनी दिले व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. ग्रामीण भागात खोलवर गेलेली ही पहिली चळवळ होती. बहुजन समाजाला आत्मावलोकन करण्यास शिकविणारा व त्या समाजाला स्वसामर्थ्याची जाणीव करून देणारा म. जोतिबा फुले हा पहिला महापुरुष होय.

व्यक्तीचे मुलभूत अधिकार, धर्मसत्तेतून निर्माण होणाऱ्या हक्कांना नकार, धार्मिक उपासनेचे स्वातंत्र्य व माणसाच्या सर्वांगीण विकासाचा माणूस हाच शिल्पकार असल्याने तिच्या स्वयंप्रेरणेचा व प्रज्ञेचा स्वीकार या आपल्या भारतीय राज्यघटनेच्या प्रमुख सूत्रांचा १९ व्या शतकातच आग्रह सत्यशोधक चळवळीने धरला होता. आज नाही तर उदया प्राप्त होणाऱ्या राजकीय स्वातंत्र्याचे अधिष्ठान जी सामाजिक लोकशाही तिची प्रस्थापना करण्याचे प्रयत्न सत्यशोधक समाजाच्या चळवळीने केले. सामाजिक न्यायाची मागणी करणारा व व्यक्तीला विकासाची समान संधी मिळाली पाहिजे यांचा आग्रह धरणारा सत्यशोधक समाज हा पहिला समाज होय. सामाजिक व धार्मिक गुलामगिरी संपविण्यासाठी म. फुलेंनी संघर्षवादी व व्यवहारिक भूमिका स्वीकारून धार्मिक विधीतील पुरोहित नाकारला. पुढे वेदोक्त प्रकरणात राजर्षि शाहू महाराजांनी शंकराचार्यच नाकारले. २८ नोव्हेंबर १८९० रोजी सत्यशोधक समाजाचे जनक म. फुले यांचा मृत्यू झाला. त्यानंतर सत्यशोधक चळवळीचे काम काही काळ थंडावले. १८९० नंतर सावित्रीबाई फुले, भाऊ कोंडाजी डुमरे, नारायण मेघाजी लोखंडे. नारो बाबाजी महाभट्टशास्त्री, कृष्णराव भालेकर, मारूतराव नवले, ग्यानोबा ससाणे, धर्माजी डुंबरे, ज्ञानगिरी बुवा व नारायण पवार यांनी सत्यशोधक समाजाचे कार्य प. महाराष्ट्र, विदर्भ व मराठवाड्यात पसरविले. १९१० च्या सुमारास म. फुले यांच्या सहकार्यांची पिढी जवळपास संपलेली होती. बहुजन समाजातील लोकांचे अज्ञान, दारिद्रय व ब्राह्मणांनी धर्माच्या नावाखाली चालविलेली जुलूमशाही नष्ट करण्यासाठी छ. शाहू महाराजांनी या चळवळीचे पुनरूज्जीवन केले. १९११ मध्ये 'कोल्हापूर शाहू सत्यशोधक समाज' स्थापन करण्यात आला.[४] त्यांच्या कारकीर्दीत या चळवळीस अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. विशेषतः १९१२ पासून १९२२ पर्यंत त्यांनी जाती निर्मूलन, सामाजिक समता, बहुजन समाजासाठी शिक्षणाच्या सोई आदी क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य केले.

तत्कालीन बहुजन समाजातील तरुण मंडळीना छ. शाहू महाराजांनी सत्यशोधक समाजाच्या

कामाला लावले. महाराष्ट्रात ठिकठिकाणी सत्यशोधक समाजाची अधिवेशने भरू लागली या अधिवेशनातून म. फुलेंचा सामाजिक समतेचा विचार बहुजन समाजापर्यंत पोहचविण्यावर भर देण्यात आला. तसेच ब्राह्मणांच्या धार्मिक व सामाजिक वर्चस्वाविरूद्ध प्रचार करण्यात आला. त्यामुळे महाराष्ट्रात पुन्हा एकदा बहुजन समाज खडबडून जागा झाला व त्यामुळे सत्यशोधक चळवळीच्या कार्याला गती आली.

सत्यशोधक चळवळीची व्याप्ती या काळात खूपच वाढली. महाराष्ट्रातील अनेक गावात सत्यशोधक समाजाच्या शाखा उघडण्यात आल्या. या चळवळीच्या वाढत्या प्रसाराबरोबर तिच्या प्रवाहात असंख्य कार्यकर्ते सामील होऊ लागले. तरुण व धडाडीच्या कार्यकर्त्यांची एक जबरदस्त फळीच तयार झाली. पुणे शहरात केशवराव जेधे व दिनकरराव जवळकर या जोडीने सनातन्यांच्या बालेकिल्यावरच धडक मारून सत्यशोधक चळवळीचा दबदबा निर्माण केला सनातनी ब्राह्मण वर्गाला त्यांच्याच भाषेत प्रत्युतर देण्याचा चंग बांधला. छ. शाहू महाराजांच्या प्रेरणेने सातारा जिल्ह्यातील सत्यशोधक चळवळीला चांगलीच गती आली होती. बहुजन समाजातील अनेक तरुणांनी या चळवळीला वाहून घेतले होते. या काळात भास्करराव जाधव, आण्णासाहेब लठ्ठे, केशवराव बागडे, एस. टी. डोंगरे इ. व्यक्तींच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक चळवळ कोल्हापूर, सातारा, पुणे, नगर या भागात पसरली होती. या काळात सातारा जिल्हा हे सत्यशोधक चळवळीचे केंद्रस्थान बनले होते.[५]

सातारा जिल्ह्यात केशवराव विचारे, भाऊराव पाटील, नाना पाटील, रा. ना. चव्हाण, राजाराम फाळके, शाहीर पुंडलीक फरांदे, दत्ताजीराव बाजीराव जाधव, माधवराव धुमाळ, पुंडलीक हरी घाटगे (गुरुजी), व्यंकटराव कदम, पांडुरंग ससाणे, मल्हारी ससाणे, शंकरराव कृष्णाजी माने, मारूती आप्पा जमदाडे, लक्ष्ण बाबूराव कारंडे, धनसिंग बाळा राजपुरे, गोपाळराव धोंडीजी सांळुखे,

बापुसाहेब तातोबा चव्हाण, रावसाहेब वांगडे, शाहीर आत्माराम रामचंद्र इंगळकर, एन्. एम्. काटकर, गोपाळराव रामचंद्र फाळके, जोत्याजीराव फाळके इ. कार्यकर्त्यांनी सत्यशोधक चळवळीच्या कार्यात सातारा जिल्ह्यात हिरारीने भाग घेतला. त्यामुळे सातारा जिल्हा हा सत्यशोधक चळवळीचा बालेकिल्ला म्हणून ओळखला जाऊ लागला.[६]

## सत्यशोधक चळवळीची सामाजिक व्याप्ती

ब्राह्मणेत्तर चळवळ व सत्यशोधक चळवळ यांनी समाजात निर्माण झालेली जन्मजात जाती व्यवस्था, श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभाव नष्ट करण्यासाठी आपापल्या परीने प्रयत्न केले. 'सत्यशोधक समाजाचे सत्यसंशोधन हे समाजाचे शाश्वत ध्येय आहे व भोळाभाव नाहीसा करणे हे मुख्य कार्य आहे.'[७] या विचारातून समाजातील अनिष्ठ प्रथा, रुढी, परंपरा यावर म. फुले यांनी ''गुलामगिरी'' या ग्रंथातून कठोर टीका केली. सर्व माणसे समान असून ती एकाच निर्मिकाची लेकरे आहेत. जातीभेद व अनिष्ट प्रथा ईश्वर निर्मित नसून मानवनिर्मित आहेत हा परखड विचार मांडला. सत्यशोधक समाजाचा ब्राह्मण्यवादाला विरोध होता. या देशात अनार्य, अदिवासी, शुद्रातिशुद्र इत्यादिकावर आर्यकाळापासून धर्मग्रंथाधारे पुरोहितांनी गुलामगिरी लादली आहे. ही गोष्ट त्यांनी जनतेच्या, सरकारच्या नजरेस आणून दिली. आवतार, कल्पना, पौराणिक विसंगती, जातीभेद, अस्पृश्यता, मनुस्मृतीवर आधारित सामाजिक विषमता व ईश्वरनिर्मीत धर्मग्रंथ या कल्पनावर व रुढीवर म. फुलेनी 'न भूतो न भविष्यती' असा हल्ला चढविला.[८]

वेद व वर्ण मानवनिर्मित असून ही वर्ण वर्चस्ववादी समाजव्यवस्था मोडून काढली पाहिजे, देव व भक्त यामध्ये दलालाची गरज नाही या तत्वातर सत्य, न्याय, बंधुता, समानता व मानवतेच्या आधारावर समाजनिर्मितीचे ध्येय ठेवून सत्यशोधक समाजाची निर्मिती म. फुले यांनी केली. सर्व धर्मग्रंथ मानव निर्मित असून या ग्रंथावरआधारलेले सर्व धर्म हे माणसामाणसात फूट पाडणारे आहेत

म्हणून ते टाकावू आहेत हे या देशामध्ये सर्वप्रथम ठणकावून सांगण्याचे धाडस म. फुले यांनी केले.[९]

म. जोतिबा फुले यांनी सत्यशोधक समाजाच्या कार्याला कोणत्याही मर्यादा घातल्या नाहीत. सत्यशोधन हेच समाजाचे एकमेव ध्येय मानून सत्यात संकुचितपणा आणण्याचे काहीच कारण नाही. मानव जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात विषमता व गुलामगिरी नको आहे, सर्व क्षेत्रात समता व स्वातंत्र्य पाहिजे, सत्यापुढे कोणाचीही कदर करू नये, पुरोहितशाही व मध्यस्थ स्वजातीचा असला तरी तो घातकच आहे, कारण स्वावलंबन व आत्मप्रगती बुडवून तो धर्माचा धंदा करतो. म्हणून सर्व मानवास समान हक्क असले पाहिजेत असे त्यांनी सार्वजनिक सत्य म्हणून सांगितले.[१०]

म. फुले चातुर्वण्याचे, जातीभेदाचे व सामाजिक विषमतेचे कट्टर वैरी होते. या विषम समाजव्यवस्थेचे निर्माते व नेते म्हणून त्यांचा ब्राह्मणांना निःसंशय विरोध होता. या सामाजिक विषमतेचा व अन्याय समाजव्यवस्थेचा अभिमान बाळगणाऱ्या, ती विषमता टिकविण्यासाठी धडपडणाऱ्या व या विषम समाजव्यवस्थेत ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा ज्ञानाची व सत्तेची मक्तेदारी टिकविणाऱ्या लोकांना व त्यांच्या ब्राह्मण पुढारीपणाला मात्र म. फुलेंचा जळजळीत विरोध होता.[११]

सत्यशोधक समाजाने स्थापनेपासूनच कोणतीही जात जन्मतः श्रेष्ठ अथवा कनिष्ठ असत नाही, सद्याच्या युगात क्षत्रिय, वैश्य नाहीत हे विद्वानांचे मत अयोग्य आहे, स्त्रीयांचे धार्मिक व सामाजिक क्षेत्रातील अधिकार पुरुषांच्या बरोबरीचे आहेत, पौरोहित्य व वेदांचा सर्वांना समान हक्क आहे. बुद्धी हेच धर्माचे प्रमाण आहे. जन्मावरून अस्पृश्यता पाळणे अयोग्य आहे. या मतांचा पुरस्कार केला.

''म. फुले हे ब्राह्मणाविरूद्ध नव्हते. ते ब्राह्मण्याविरूद्ध होते आणि ब्राह्मण्याविरूद्ध तरी यांची चळवळ असण्याचे कारण म्हणजे ब्राह्मण हा जन्माने ब्राह्मण आहे म्हणून नव्हे, तर तो अडाणी बहुजन समाजाचा देवभोळेपणा वाढविण्यास मदत करून त्यांना धार्मिक व सामाजिक गुलामगिरीत

ठेवण्याचे काम करतो म्हणून. म. जोतिबा फुले यांची चळवळ बहुजन समाजाच्या जागृतीची होती. दलितांचा उद्धार करायचा आणि जाती भेदाचे स्तोम माजविणाऱ्या वर्णाश्रमी सनातनी भिक्षुक वृत्तीचा नायनाट करायचा हे म. फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचे रहस्य होते आणि आहे.'' समता आणि बंधुभाव या दोनच भावनेवर सत्यशोधक समाजाची चळवळ उभारली आहे. हे श्री. केशवराव विचारे यांचे विधान अत्यंत विचारणीय आहे.[१२]

विषमतेविरूध्द फुल्यांची ही बंडखोरी सर्वार्थाने ऐतिहासिक ठरावी एवढी तिची झेप होती, आवाका होता. हिंदू धर्मातील अन्यायाविरूध्द, विषमतेविरूध्द पूर्वीही अनेक थोर साधुसंतानी निषेधाचे आवाज उठविले होते. पण ते केवळ करूणेच्या, भूतदयेच्या भावनेने. त्या सर्व साधुसंताच्या मते ही समाजरचना मूळांत योग्यच होती, कर्मसिध्दांत हा शास्त्रशुध्दच होता. दलितांबद्दल दया दाखवावी, त्यांचे दुःखदैन्य सौम्य करावे, हलके करावे पण त्यात विषमतेपासून सुटका नव्हती कारण निसर्गाने, परमेश्वराने ती योजलेली होती. यामुळे फुल्यांच्या पूर्वीचे सर्व साधुसंत, सर्व विचारक, महात्मे चातुर्वर्ण्याच्या चौकटीतच घुटमळत होते. ही विषमता किंचित सौम्य करून ते तिला दलित बहुजन समाजाची मान्यताच एक प्रकारे मिळवित होते. विषम चातुवर्ण्य प्रथेला मूळापासून या साधुसंताचा विरोध तर नव्हताच; पण उलट ती ईश्वरनिर्मित आहे, समाजधारणेला आवश्यक आहे, अशीच त्यांची मनोमन धारणा होती. आणि अशा या विषम, अन्याय समाजपध्दतीचे निर्माते, नेते व श्रेष्ठी हे जन्मजात ब्राह्मणच आहेत; दुसरे कोणीही असूच शकत नाहीत. अशीच साधुसंताची श्रध्दा होती. नामदेवापासून चोखोबा - तुकोबापर्यंत जे वेगवेगळ्या हीन, दीन जातीमधील संत निर्माण झाले त्यांनी करूणेने, वेदनेने मधून मधून कितीही आर्त उद्‌गार काढले तरी त्यांना चातुवर्ण्य मूळात मान्यच होते. ब्राह्मणाचे जन्मजात गुरुपदही मान्यच होते. ब्राह्मण कितीहि भ्रष्ट झाला तरी तो श्रेष्ठच आहे, अशीच त्यांची श्रध्दा होती. दलित, शोषित, हीन, दीन समाजाला जास्तीत जास्त दिलासा त्यांनी दिला तो भक्तीचा, भागवत

धर्माचा. पण त्याचा महिमा फक्त वारकरी दिंडीपुरता आणि चंद्रभागेच्या वाळवंटापुरताच मर्यादित होता. विठ्ठलाच्या मंदिराची पायरी तो कधीही चढू शकला नाही.[१३]

## सत्यशोधक चळवळीची धार्मिक व्याप्ती

हिंदु धर्मात सतीची चाल, ख्रिस्तपूर्व काळात सुरु झाली. इ. स. ९ व्या शतकापर्यंत विधवांचे केशवपन करण्याची प्रथा अस्तित्वात नव्हती. इ. स. १००० पर्यंत बालविधवांचे विवाह होत असत.[१४] पण नंतर ही चाल ब्राह्मण समाजाबरोबर इतरही हिंदू समाजात पसरत गेली. विधवांचा अमानुष छळ केला जात असे. त्यामुळे इंग्रज सरकारने १८२९ साली कायद्याने सतीच्या चालीला बंदी घातली आणि विधवेला चितेच्या दाहक ज्वालापासून वाचविले. सती न जाणाऱ्या विधवेचे केशवपन केले जाई. विधवेचे दर्शन हे अशुभ चिन्ह मानण्यात येई. आपल्या मुलांच्या विवाह समारंभाला मुंजीला अथवा कोणत्याही शुभ कार्याला तिला हजर राहता येत नसे. शोकात आणि दुःखातच तिचा अंत एकाद्या कोनाड्यात होई अथवा व्यभिचारात बुडून भ्रुणहत्येने तिचे हात लाल होत. त्यामुळे सर्व कुंटुंबाला काळीमा लागत असे. विधवांची ही दयनीय स्थिती दूर करण्यासाठी महाराष्ट्रात १८४० साली विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रचार पुण्यातील विष्णुशास्त्री बापट या आद्य प्रचारक व सुधारकाने केला. त्यांनी १८४२ साली बेळगाव मध्ये दोन ब्राह्मण विधवांचा पुनर्विवाह करून दिला.[१५]

१८५६ मध्ये ब्रिटिश सरकारने विधवा विवाहाचा कायदा संमत केला. महाराष्ट्रात १८५७ मध्ये बाबा पदमजी यांनी आपल्या 'यमुना पर्यटन' या कादंबरीत हिंदू विधवांची दुःखे जगाच्या वेशीवर टांगली. या पार्श्वभूमीवर वरीष्ठ वर्गामध्ये या अनिष्ट रूढी नष्ट करण्यासाठी म. फुले यांनी महाराष्ट्रात क्रांतीकारी पाऊल उचलले. विधवांच्या पुनर्विवाहाचा प्रश्न जरी ब्राह्मण आणि उच्च जातीशी निगडीत होता. तरी विधवांची ही दैन्यावस्था पाहून जोतिरावांचे मन गहिवरले. अन्यायाचा प्रतिकार करणे हा जोतिरावांचा बाणा होता. पुनर्विवाहाच्या चळवळीस त्यांनी सक्रीय पाठींबा देऊन पुढाकार

घेतला. त्यांनी १८६४ मध्ये एका शेणवी जातीतील विधुराचा पुनर्विवाह घडवून आणला.[१६]

जोतिराव फुल्यांनी अत्याचारीत विधवानी गुप्तपणे येऊन बाळंत होण्यासाठी आणि आपली मुले तिथेच ठेवण्यासाठी एक बालहत्या प्रतिबंधक गृह स्वतःच्या घरातच सुरु केले. ब्राह्मण स्त्री काशीबाई हिला आपल्या बालहत्या प्रतिबंधक गृहात प्रवेश देऊन तिचा मुलगा यशवंत म. फुल्यांनी दत्तक घेतला.

म. फुल्यांनी सर्व माणसे एकाच निर्मिकाची लेकरे आहेत. प्रत्येक मानवाला परमेश्वराची भक्ती करण्याचा अधिकार आहे. आईला भेटण्यास अगर बापाला प्रसन्न करण्यास ज्याप्रमाणे मध्यस्थाची गरज नसते त्याप्रमाणे देवाची उपासना करण्यास पुरोहिताची गरज नाही असे परखडपणे मत मांडले.

म. फुले यांनी शुध्द ज्ञान-विज्ञान निष्ठेचा आणि प्रखर बुध्दिवादाचा सतत आग्रह धरला. मूर्तिपूजा, कर्मकांड, नवस, व्रत-वैकल्ये, भोळसटपणा, भाकडकथा, अवतारबाजी, बुवाबाजी या सर्वांचा त्यांना अतिशय तिटकारा होता.[१७]

## सत्यशोधक चळवळीची शैक्षणिक व्याप्ती

हजारो वर्षे बहुजन समाज अज्ञान अंधःकारात खितपत पडला होता. त्याला शिक्षणाची दारे बंद होती. शिक्षण देणे व घेणे हा केवळ ब्राहमणांचा अधिकार होता. म्हणून बहुजन समाजाला साक्षर केल्याशिवाय समाज-सुधारणा करणे अशक्य आहे याची जाणीव म. फुले यांना झाली, म्हणून त्यांनी १८४८ मध्ये पुण्यात मुलींची पहिली शाळा सुरु केली. त्यानंतर त्यांनी अस्पृश्यांच्या मुलांसाठी १८५१ साली शाळा सुरु केली. त्यांचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीचे कार्य राजर्षि शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर या त्रिमूर्तीनी पुढे चालू ठेवले.

बहुजन समाजाच्या शिक्षणासाठी कर्मवीर भाऊराव पाटील यांनी काले येथे सत्यशोधक

समाजाच्या सभेत १९१९ साली 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केल्याची घोषणा करून आपल्या शैक्षणिक कार्याची सुरूवात वसतीगृहापासून केली. त्यानंतर 'व्हॉलंटरी प्रायमरी' स्कूलस् स्थापन केली. या संस्थेमार्फत त्यांनी शाळा-महाविद्यालयाची स्थापना करून बहुजन समाजातील लोकांच्या शिक्षणाची क्रांतीकारी कार्य केले. राजर्षि शाहू महाराजांनी कोल्हापूरात बहुजन समाजाच्या मुलांसाठी अनेक वसतीगृहे सुरु केली. अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण क्षेत्रात तसेच नोकऱ्यामध्ये आरक्षण ठेवून त्यांच्या उन्नतीला मोठा हातभार लावला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दलित व अस्पृश्य समाजाच्या उद्धाराचे महान कार्य केले. (शैक्षणिक कार्याचा आढावा आपण पुढील प्रकरणात घेणार आहोत)

<u>तत्वज्ञान</u>

शेतकरी वर्ग दरिद्री व कष्टकरी आहे. त्याच्या उध्दारासाठी प्रथम प्रयत्न करण्याची गरज म. फुलेंनी अचूकपणे हेरली व या सर्वसाधारण गरीब, दुर्बल, श्रमिक पण उत्पादक वर्गासाठी जोतीरावांनी सत्यशोधक समाज सुरु केला.

ग्रंथ ईश्वरनिर्मित व देवदत्त आहेत. त्यांच्या आधाराने समाज चालला पाहिजे असा आग्रह धर्म मार्तंडांचा होता. शास्त्रीपंडीत अपरिवर्तनीय सनातन धर्माचे कट्टे रक्षणकर्ते होते व हे सर्वस्पर्शी दडपण दूर करण्यासाठी सत्यशोधक समाज स्थापन झाला. सामाजिक व धार्मिक जागृती करून इतर सर्वांना अज्ञानातून बाहेर काढून ज्ञानाच्या व विद्येच्या द्वारे सज्ञान करण्याचे कार्य या समाजाने केले.

निर्मिकाच्या संदर्भात सर्व माणसे समान आहेत. धर्मग्रंथाचे ईश्वरी प्रामाण्य सोडून देऊन ज्या ग्रंथामध्ये समानता आहे असा ग्रंथ मग तो कोणत्याही देशातील असो व ज्याचा सर्वांना सारखा उपयोग घेता येतो असा ग्रंथ मनुष्य निर्मित मानावा असे पहिले सूत्र जोतिरांवानी मांडले. मात्र कोणत्याही

धर्माचा धर्मग्रंथ प्रमाण धरा असे त्यांनी सांगितले नाही. दास्य व अस्पृश्य मानण्याची जी कारणे होती ती दूर केल्यानंतर ज्याने ती दूर केली तो आपल्याच कुटुंबातील आहे असे समजून सत्यशोधकाने त्याच्याशी वर्तन करावे. असा भावार्थ जोतिबांनी जाहीर केला.[१८]

सत्यशोधक चळवळीची पाच प्रमुख अंगे खालीलप्रमाणे आहेत.

१. जातीव्यवस्था नष्ट व्हावी.

२. चातुवर्ण्य व्यवस्था नाहीशी व्हावी.

३. सर्वांना शिक्षण मिळावे.

४. अंधश्रध्दा नाहीशा व्हाव्यात.

५. शेतकरी व कष्टकरी यांचे शोषण थांबावे.[१९]

अशाप्रकारे वरील पाच प्रमुख बाबींचा विचार करणारी महाराष्ट्रव्यापी अशी समाजसुधारणेची ही पहिली चळवळ होय.

## भारतीय सत्यशोधक समाज

**नाव** - या संस्थेचे नाव 'सत्यशोधक समाज' असे राहील.

**उद्देश** - दैववादी व कल्याणवादी विचारसरणी समाजाच्या नाशाला कारणीभूत झालेली आहे. या साठी प्रयत्नवादी, शास्त्रशुध्द विचारसरणीने धार्मिक गुलामी नाहीशी करणे, सामाजिक सुधारणा करणे, सहकार्याने व स्वावलंबनाने समाजास अनाठायी होणारा पैशाचा, श्रमाचा आणि वेळेचा नाश थांबविण्यास लावून उच्च दर्जाची सुखे उपभोगणारी व माणुसकीने जगता येईल अशी समता, बंधुता व सहकारिता या तत्वावर आधारलेली समाजरचना करण्यास मदत करणे, हे समाजाचे ध्येय राहील. हा समाज राजकारणापासून अलिप्त राहील.

**कार्यक्रम** - समाजाचा प्रसार झपाट्याने होण्यासाठी व समाज कार्यक्षम होण्यासाठी प्रमुख असे

कार्याचे चार विभाग पाडण्यात येतील/आले.

अ. शिक्षण - ज्ञानाचा प्रसार करणे, विचार जागृती करणे.

ब. संघटना - सभासद वाढविणे, स्वयंसेवक तयार करणे, घटक समाज स्थापन करणे.

क. प्रचार - नियतकालिके, पुस्तके प्रसिध्द करवून समाज मतांचा प्रसार करणे. सभा, कलापथके यांच्या मार्फत हेच काम करवून घेणे.

ड. अर्थ - समाजाला आपली अर्थिक उन्नती करून घेण्यास अनाठायी होणारा खर्च वाचविण्यास लावणे व सामुदायिकपणे सहकार्याने उत्पादन वाढविण्यास सहाय्य करणे.

वरील चारही खात्यांचे प्रमुख महाध्यक्ष राहतील व ते मंत्र्याच्या मार्फत काम पहातील.[२०] समाजात असलेले अज्ञान, अंधरूढी, भोळेपणा, कर्मकांड व त्यामुळे निर्माण झालेली मानसिक गुलामगिरी नष्ट करून लोकात खरा विचार व स्वत्वाची जाणीव निर्माण होण्यासाठी सत्यसोधक समाजामार्फत वैचारिक क्रांतीचे युग सुरु केले.

सत्यशोधक समाजाची प्रमुख तीन तत्वे आहेत -

१. ईश्वर एक असून तो निर्गुण, निराकार, निर्विकार व सर्वव्यापी आहे.

२. ईश्वर आणि भक्त यामध्ये पुरोहित दलालाची गरज नाही.

३. मनुष्य जातीने श्रेष्ठ नसून गुणाने श्रेष्ठ ठरतो.[२१]

या तत्वांचा विचार केल्यास सत्यशोधक समाजावर केले गेलेले आरोप हे पूर्वग्रहदूषीत असून उलट ही चळवळ मानवतावादी आहे हे सहज समजून येईल. वरील तत्वांचा प्रचार व प्रसार होण्यासाठी आणि मानसिक गुलामगिरी नष्ट होण्यासाठी आजही सत्यशोधक समाजाची आवश्यकता आहे.

१९२० सालच्या जुलै महिन्याच्या १७ व १८ तारखेला सातारा येथे भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली सातारा जिल्हा सत्यशोधक समाजाची परिषद भरली होती. भास्कररावांनी

आपल्या अडीच तासाच्या भाषणात सत्यशोधक समाजाची तत्वे समजावून सांगीतली, ती अशी -

१. सर्व माणसे परमेश्वराची लेकरे आहेत म्हणून माणसामाणसात कृत्रिम भेदभाव असू नयेत.

२. जातिभेद निर्मूलन करणे समाजाचे ध्येय आहे.

३. परमेश्वराची भक्ती, पूजा व इतर सामाजिक व धार्मिक कार्य करण्याचा सर्वांना समान हक्क आहे.

४. समाज विघातक चालींचा विध्वंस करून जनतेत ज्ञानाचा प्रसार करून त्यांना सुबुध्द करणे व अन्यायाचा प्रतिकार करण्यास त्यांना समर्थ करणे हे समाजाचे प्रमुख कर्तव्य आहे.[२२]

१९४० साली भरलेल्या परिषदेने सत्यशोधक समाजाची पुढील तत्वे ठरविली आहेत.

१. सर्व माणसांचे परस्पर बंधुत्वाचे व समानतेचे नाते आहे. केवळ जन्मावरून मनुष्या मनुष्यात उच्च नीच पणा मानणे योग्य नाही.

२. अवतार कल्पना भ्रममूलक आहे म्हणून मूर्ती कल्पून तिची पूजा करणे हा खुळेपणा आहे.

३. फलज्योतीष व दैववाद या कल्पना खोट्या आहेत व त्यायोगाने अज्ञानी लोकांची फसवणूक होत आहे.

४. समाजाच्या आजच्या परिस्थितीत लग्न संस्था जरूर आहे. लग्ने शक्य तितकी नोंदणी पध्दतीने करावीत अशी या परिषदेची शिफारस आहे.

५. आपल्या मुला मुलींना शक्य तितके शिक्षण देणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

६. वेद, स्मृति, पुराणे व महाभारत रामायणासारखे इतिहास वगैरे ग्रंथात सांगीतलेले धर्म व आचार आजच्या विवेकास पटतील तेच घ्यावेत. न पटतील त्यांच्याकडे दुर्लक्ष करावे.

अशी सहा तत्वे सांगीतली आहेत. सत्यशोधकास ती पाळण्यासाठी पुढील प्रमाणे प्रतिज्ञा करावी लागे.

'सत्यशोधक समाजाची ही सहा तत्वे मला पूर्णपणे मान्य आहेत. त्याप्रमाणे वागण्याचा मी सदैव प्रयत्न करीन, अशी मी प्रतिज्ञा करीत आहे.'

वरीलप्रमाणे प्रतिज्ञा केल्यावर १९४० साली भरलेल्या परिषदेने काही नियम सत्यशोधकासाठी सांगीतले आहेत.

## समाजाचे नियम

१. वरीलप्रमाणे प्रतिज्ञा ज्याने केली आहे तो सत्यशोधक समाजाचा मेंबर समजावा.

२. असे पाच किंवा जास्त मेंबर ज्या गावी असतील त्या गावी सत्यशोधक समाज स्थापन झाला असे समजावे.

३. प्रत्येक गावी निदान एकतरी समाज असावा. शहरात जास्त असल्यास बरे.

४. मेंबरानी आपल्यापैकी अध्यक्ष, चिटणीस व खजिनदार नेमावे.

५. वर्गणी वर्षास एक रुपया कमीत कमी घ्यावी.

६. प्रत्येक सत्यशोधकाने आपले गावी व इतरत्र जास्त मेंबर मिळवून समाजाचे सामर्थ्य वाढवावे.

७. आपल्या गावी होणाऱ्या प्रत्येक लग्न व पुनर्लग्न यांची नोंद ठेवावी तींत वधूवरांची व त्यांच्या बापाची नावे, वय, शिक्षण, हजर असलेल्या मंडळीची संख्या, त्यातील प्रमुख अशा पाच आसामीची नावे, व प्रत्येक पक्षाने केलेला अंदाजी खर्च ही माहीती असावी. वधु वर व प्रमुखमंडळी यांच्या सह्या घेतल्यास बरे.

८. लग्न कार्यात प्रत्येक बाजूने खर्च केलेल्या रकमेवर शेकडा प्रमाणात समाजास मदत मिळविण्याचे प्रयत्न करावे, ही मदत मुळीच मिळाली नाही किंवा कमी मिळाली तरी नोंद अवश्य करावी.

९. मेंबरशिप वर्गणी, लग्न कार्यातील देणगी व इतर प्रसंगाने मिळालेली मदत या मार्गांनी गाव सत्यशोधक समाजाचा फंड जमवावा. याचा उपयोग गावाच्या उन्नतीच्या पुढे सांगीतलेल्या कामाकडे

व्हावा.

१०. प्रत्येक समाजाने एक वाचनालय चालवावे व त्याला जोडून एक लायब्ररी असावी. गावात पूर्वी स्थापन झालेले वाचनालय असल्यास त्याची व्यवस्था सत्यशोधक समाजाकडे येईल असे प्रयत्न करावे. ते सिध्दिस न गेल्यास त्या वाचनालयाचा फायदा घ्यावाच पण सत्यशोधक समाजाचे स्वतंत्र वाचनालयही काढावे.

११. समाजाने चालविलेल्या वाचनालयात मुख्य समाजाने चालविलेली किंवा शिफारस केलेली वर्तमानपत्रे व मासिके अवश्य घेतली जावी. त्याचप्रमाणे सत्यशोधक मताची पुस्तकेही संग्रहावीत. पैशाची सवड असल्यास दुसरी वर्तमानपत्रे व पुस्तके वाचनालयासाठी जरूर घ्यावी.

१२. जिल्हा व तालुका लोकल बोर्ड, म्युनिसीपालिट्या, गावपंचायती, नोटी फाईड एरीया कमिटी वगैरे संस्थाचा कारभार चोख रीतीने चालेल असे प्रयत्न समाज मेंबरानी करावे.

१३. सरकार लोकल बोर्ड, म्युनिसीपालिटी, खाजगी मंडळी किंवा व्यक्ती यांनी चालविलेल्या सर्व प्रकारच्या शिक्षण संस्थाची स्थिती चांगली राहावी असे प्रयत्न करावे.

१४. आपल्या गावातील शाळेत जाण्याच्या वयाचे मुलगे व मुली शाळेत शिकण्यास जातील असे प्रयत्न करावे. त्याचप्रमाणे गावांतील निरक्षर प्रौढ माणसास निदान लिहिता वाचता येईल इतके शिक्षण मिळेल या विषयीही झटावे.

१५. मुलास व मुलीस स्काऊटचे शिक्षण देण्यात यावे त्याचप्रमाणे सर्वांना शारीरिक शिक्षणाची गोडी लावण्याचे काम करावे.

१६. कोणावरही जुलूम किंवा अन्याय होऊ देवू नये. गावात फळ्या असल्यास त्या मोडून एकी करावी.

१७. बी-बीयाणे, खते, औते व शेतीच्या पध्दती यात अनुभवाने ज्या सुधारणा शेती खात्यातील

निष्णातांनी फायदेशीर ठरविल्या आहेत त्या आपण आपल्या शेतीत उपयोगात आणाव्यात व त्यांची माहिती लोकास देऊन शेती सुधारण्याचे प्रयत्न करावे.

१८. दुकानदारीत, व्यापारात, दलालीत वगैरे अनेक मार्गांनी शेतकऱ्यांना फसवून बाहेरचे पुष्कळच व्यापारी गबर झाले आहेत. व शेतकऱ्यांच्या जमिनीही बळकाऊन त्यांना निव्वळ मजूर बनवीत आहेत. शेतकरी वर्गातील लोकानी गावोगाव आपली दुकाने काढणे व व्यापारी पेठेत आपल्या पेढ्या स्थापून त्या पेढ्यांशीच व्यवहार करणे हा या अन्यायावर महत्वाचा उपाय आहे. तसेच परदेशी व परप्रांती सावकाराच्या हाती व्याजबट्ट्याचा धंदा यापुढे राहू देणे हितावह नाही. यासाठी पतपेढीच्या किंवा इतर मार्गांनी सावकारीही शेतकरी वर्गाच्या हाती येईल असले प्रयत्न कायदयाचे उल्लंघन न होईल अशा शांततेच्या मार्गानी धीमे-धीमे करण्यात यावे.

१९. देवऋषी, ज्योतिषी, भूते, खेते, नाचविणारे, अंगात वारा आणणारे तसेच वाघ्या, मुरळ्या, कडक लक्ष्म्या असल्या लोकांच्या फसवेगिऱ्या व ढोंगे उघडकीस आणावी व त्यांच्या कारवाईस कोणी फसू नये असे प्रयत्न करावेत.

२०. पंढरी व इतर लहान-मोठ्या क्षेत्रांच्या वाऱ्या किंवा यात्रा करणे, गावच्या परगावच्या देवाचे उत्सव करणे वगैरे प्रकारास आळा घालण्याचे प्रयत्न व्याख्यान, चर्चा वगैरे व अन्य मार्गांनी करावे.

२१. लग्न कार्य, वास्तुशांती, श्राध्द, पक्ष मृतांचे संस्कार करणे किंवा दिवस घालणे याकामी होणारे खर्च शक्य तितके कमी करणे हे समाज हिताचे काम आहे. यासाठी समारंभातील अवडंबर शक्य तितके कमी करण्यात यावे.

२२. सारांश, आपली व आपल्या गावाची सर्व अंगाने सुधारणा व्हावी. सांपत्तिक, तेथील लोकांचे शिक्षण विषयक, औद्योगिक व्यापारी वगैरे सर्व बाबतीत उन्नती व्हावी असे प्रयत्न प्रत्येक समाजाने केले पाहिजेत.

२३. कोणत्याही तालुक्यात दहा समाज स्थापन झाल्यावर त्यांनी आपले फेडरेशन म्हणजे तालुका समाज स्थापावा.

२४. पाच तालुका समाज स्थापन झाल्यावर जिल्हा समाज स्थापावा.

२५. प्रत्येक समाजाने आपला उत्सव सालातून एकदा तरी करावा. आसपासचे गावचे सत्यशोधक समाजीय बोलवावे. बाहेरचा एखादा वक्ता खर्च देऊन बोलवावा सभा वगैरे करून उत्सव एका दिवसात आटपावा. गावची हरएक बाबतीत प्रगती कसकशी झाली याचा अहवाल यावेळी वाचून दाखवावा.

२६. सत्यशोधक समाजसेवक व प्रचारक तयार करण्याचे वर्ग मध्यवर्ती मंडळांनी ठिकठिकाणी काढावे व या सेवकास एक-एक वर्षाच्या अंतराने उजळणीच्या वर्गात जास्त शिक्षणही द्यावे.

२७. प्रत्येक तालुक्यात एकतरी पगारी समाजसेवक नेमण्यात यावा. त्याचा पगार तालुका समाजाने दयावा.

२८. जिल्हा समाजाने एक श्रेष्ठ दर्जाचा व शिक्षणाचा पगारी समाजसेवक ठेवावा व तो चांगला वक्ता व सुशिक्षित असावा व त्याला समाजसेवक शिक्षणाचे वर्ग चालविण्याची पात्रता त्याच्या ठिकाणी असावी.[२३]

# संदर्भ


१. चव्हाण रा. ना, सत्यशोधक परिषद उगम व विकास, सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका, १९९०, (संपा. गुजर जयवंत)

२. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पुनर्मुद्रण १९९६ पृ. १४४-१४५

३. सत्यशोधक समाजाचा जाहीरनामा, २० वे अधिवेशन पृ. १

४. नलावडे उज्वला, सत्यशोधकाची संक्षिप्त गाथा पृ. १८

५. नलावडे उज्वला, उ. नि. पृ. २६

६. सत्यशोधक नामावली, सत्यशोधक समाज प्रबोधन पत्रिका १९९० (संपा. गुजर जयवंत)

७. चव्हाण रा. ना, निवडक वाङ्‌मय, (संपा. ठोके मो. नि) पारख प्रकाशन बेळगाव, प्र. आ. मार्च १९८० पृ. ९

८. कित्ता पृ. ८

९. फाळके वसंतराव, सत्यशोधक चळवळ एक प्रश्न, सत्यसंशोधन १९९८ (संपा. गुजर जयवंत) पृ. २१-२२

१०. चव्हाण रा. ना. निवडक वाङ्‌मय (संपा. ठोके मो. नि) पारख प्रकाशन बेळगाव, प्र. आ. मार्च १९८० पृ. २३

११. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्‌मय गृह प्रा. लि. गिरगाव, मुंबई प्र. आ. १९७४ पृ. २६

१२. अत्रे.प्र. के. नवयुग १७ नोव्हेंबर १९४० पृ. ५

१३. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्‌मय गृह प्रा. लि. गिरगाव, मुंबई प्र. आ. १९७४ पृ. २१

१४. कीर धनंजय, महात्मा जोतीराव फुले आमच्या समाजक्रांतीचे जनक, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पुनर्मुद्रण १९९६ पृ. ९५

१५. कीर धनंजय, उ. नि. पृ. ९६

१६. कीर धनंजय, उ. नि. पृ. ९८

१७. वैद्य प्रभाकर, महात्मा फुले आणि त्यांची परंपरा, लोकवाङ्‌मय गृह प्रा. लि. गिरगाव, मुंबई प्र. आ. १९७४ पृ. ४

१८. चव्हाण रा. ना, सत्यशोधक चळवळ उगम आणि विकास सत्यशोधक समाजप्रबोधन पत्रिका (संपा. गुजर जयवंत)

१९. ऑमवेट डॉ. गेल, सत्यशोधक चळवळीची पाच प्रमुख अंगे, सत्यसंशोधन १९९८ (संपा. गुजर जयवंत) पृ. १५

२०. विचारे के. व्ही., भारतीय सत्यशोधक समाज घटना.

२१. नरके हरि (संपा.) सत्यशोधक केशवराव विचारे समग्र वाङ्‌मय पृ. २५२

२२. कडियाळ डॉ. रामचंद्र अनंत, सत्यशोधक कै. नामदार भास्करराव जाधव यांचे जीवन व कार्य, इंदुमती प्रकाशन पाचगांव, प्र. आ. १९९० पृ. ४१-४२

२३. १९४० च्या परिषदेतील पत्रक.